सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

# सहाय्यक संचालक इतर मागास बहुजन कल्याण पुणे

डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सामाजिक न्याय भवन, स.नं.१०४/१०५, विश्रांतवाडी रोड, पोलिस स्टे शन समोर, येरवडा पुणे

दुरध्वनी व फॅक्स क्र.०२० २९७०६६११ E-mail:-adobcpune@gmail.com

---

जा.क्र.ससं/इमाबक/भासशि/विजाभज-इमाव-विमाप्र/महाडीबीटी/मार्गदर्शन/२०२४-२५/१४५२ दि.१४/०८/२०२४

प्रति,
प्राचार्य,
अनुदानित / कायम विनाअनुदानित
व्यावसायिक महाविद्यालये (सर्व),
पुणे जिल्हा.

**विषय :** शैक्षणिक वर्ष सन २०२४-२५ करिता “ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना” अंतर्गत अर्ज सादर करणेबाबतची माहिती महाविद्यालयाच्या दर्शनी भागावर प्रसिध्द करणेबाबत

**संदर्भ :** १. इतर मागास बहुजन कल्याण, मंत्रालय मुंबई, शासन निर्णय दि.१३.१२.२०२३
२.इतर मागास बहुजन कल्याण, मंत्रालय मुंबई, शासन निर्णय दि.११.०३.२०२४
३. मा.अवर सचिव, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, मंत्रालय मुंबई यांचे कडिल पत्र क्र.वगृयो-२०२२/प्र.क्र.११/योजना-५ दि.२५.०७.२०२४
४. या कार्यालयाचे पत्र क्र. १३२२ दि.२६.०७.२०२४
५. मा.संचालक, इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, म.रा पुणे यांचेकडील पत्र क्र.२७८७ दि.१३.०८.२०२४

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, आदिवासी विकास विभागाची स्वयंम योजना व सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वाधार योजनेच्या धर्तीवर इतर मागास वर्ग, विमुक्त जाती व भटक्या जमाती (भटक्या जमाती-क प्रवर्गातील धनगर समाजाचे विद्यार्थी वगळून) आणि विशेष मागास प्रवर्गातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता **"ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना"** राबविण्यास संदर्भिय शासन निर्णय क्र.१ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे.

त्यानुषंगाने या कार्यालयाकडिल संदर्भ पत्र क्र.४ अन्वये सदर योजनेंतर्गत शैक्षणिक निकष व मुलभुत निकष आपणास यापुर्वी कळविण्यात आलेले आहेत. तसेच सदर योजनेंतर्गत शैक्षणिक वर्ष सन २०२४-२५ मधील अभ्यासक्रमाच्या व्दितीय, तृतीय व चतुर्थ वर्षातील विद्यार्थ्यांना अर्ज सादर करण्याकरिता अंतिम मुदत दि.३१.०७.२०२४ पर्यंत असून अभ्यासक्रमातील प्रथम वर्षामध्ये प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांकरिता सदर योजनेंतर्गत अर्ज स्वीकृती दि.०५.०८.२०२४ पासून सुरू करण्यात येणार असून सदरच्या विद्यार्थ्यांचे अर्ज स्वीकारण्याची अंतिम मुदत दि.२०.०८.२०२४ पर्यंत राहिल याबाबत यापुर्वी सुचना देण्यात आलेल्या आहेत.

परंतू संदर्भ पत्र क्र. ५ अन्वये सदर योजनेंतर्गत सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षकरिता खालील प्रमाणे मुदत वाढ देण्यात आलेली आहे -

| अ.क्र | शैक्षणिक वर्ष | अर्ज स्वीकारण्याची तारीख | अर्ज स्वीकारण्याची अंतिम तारीख |
|---|---|---|---|
| १ | उच्च शिक्षणाचे व्दितीय, तृतीय, चतुर्थ वर्ष | दि.०५.०७.२०२४ | दि.३०.०९.२०२४ |
| २ | उच्च शिक्षणाचे प्रथम वर्ष | दि.०५.०८.२०२४ | दि.१५.१०.२०२४ |

तरी उपरोक्त तक्यामध्ये नमूद केलेनुसार सदर योजनेंतर्गत पात्र विद्यार्थ्यांना शासनामार्फत देण्यात आलेल्या मुदतवाढ बाबत अवगत करावे व संबंधित विद्यार्थ्यांना अर्ज करण्यातकरिता आपले स्तरावरून सर्वतोपरी सहकार्य कारावे.

(विशाल लोंढे)
सहाय्यक संचालक
इतर मागास बहुजन कल्याण पुणे

**प्रत - माहितीस्तव सविनय सादर:-**

१.मा.संचालक, इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, म.रा पुणे
२. मा.प्रादेशिक उपसंचालक, इतर मागास बहुजन कल्याण (प्रादेशिक) विभाग, पुणे.